# आकाशवाणी पुणे

## प्रादेशिक वृत्त विभाग

## पुणे वृत्तांत

## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 05.09.2025** **वार- शुक्रवार**

---

**<u>शिक्षक दिन</u>**

देशाचे पहिले उपराष्ट्रपती आणि माजी राष्ट्रपती, शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जयंती दिन, शिक्षक दिन म्हणून आज मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी आणि प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर यांनी डॉ. राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने शिक्षक दिनाचे औचित्य साधून २३ शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यामध्ये महापालिकेतील प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमधील शिक्षकांचा समावेश आहे.

**<u>गणेशोत्सव सांगता</u>**

सार्वजनिक गणेशोत्सवाच्या चैतन्यमय पर्वाची सांगता उद्या शनिवारी, अनंत चतुर्दशीला होणार आहे. आज अनेक ठिकाणी गणेश याग, सत्यनारायण पूजांचं आयोजन करण्यात आलं असून काही मंडळांनी पानसुपारीच्या कार्यक्रमाचही आयोजन केलं आहे.

आज दिवस भारत मुख्य विसर्जन मिरवणूक मार्गांवर जाहीरातींच्या कमानी हटविण्यात येत होत्या. तसेच मिरवणूक मार्गामध्ये अडथळा ठरू नये म्हणून काही रस्त्यांवरील झाडांच्या फांद्याही महापालिकेतर्फे तोडण्यात आल्या. मुख्य विसर्जन मार्गावरील गणेश मंडळ रात्री आज उत्तरपूजा झाल्यावर मांडव काढून घेतील, शिवाजीरस्ता आणि बेलबाग चौक पासून डुल्या मारुती मंदिरापर्यंत गणेश मंडळांचे  रथांच्या रांगा लागण्यास सुरवात झाली आहे .

यंदाच्या वर्षी विसर्जन मिरवणूक सकाळी साडे नऊ वाजता सुरू होणार असून विसर्जन मिरवणूक लवकरात लवकर संपविण्याचा मानस मनाच्या गणपतींसह प्रतिष्ठित मंडळांनी व्यक्त केला आहे.

पिंपरी चिंचवड शहरात गणेश विसर्जनासाठी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून पिंपरी चिंचवड पोलीस ठाण्याच्या हद्दीत 2146 गणेश मंडळ आहेत. अकराव्या दिवशी 959 गणेश मंडळांच्या गणरायाचे विसर्जन होणार आहे.

महाराष्ट्र पोलीस अमली पदार्थ विरोधी कृती गट आणि भोई प्रतिष्ठान यांचे संयुक्त विद्यमाने यंदा अमली पदार्थ मुक्त गणेशोत्सव 2025 ही संकल्पना राबवण्यात येत आहे. या मध्ये पुण्यातील 100 पेक्षा जास्त मंडळे सहभागी झाली असून या मंडळांनी पोस्टर ,स्लोगन, चित्रफित या माध्यमातून गणेश भक्तांमध्ये जनजागृती केली आहे.

**<u>राष्ट्रीय आरोग्य अभियान कंत्राटी कर्मचाऱ्यांचा संप</u>**

राज्यातील राष्ट्रीय आरोग्य अभियान कंत्राटी कर्मचाऱ्यांचा संप सलग अठराव्या दिवशीही कायम असून याचा थेट आणि गंभीर परिणाम आरोग्य सेवांवर होत आहे. क्षयरोग  निदान, पोषण पुनर्वसन केंद्रे , तसेच विशेष नवजात शिशु काळजी विभाग या महत्त्वाच्या सेवाही ठप्प झाल्या आहेत. राज्यात रुग्णसेवेची

स्थिती गंभीर बनली असून राज्यातील ८२  पोषण पुनर्वसन केंद्रपैकी २७ केंद्रांमध्ये संपामुळे सेवा बंद आहे.

**<u>पैगंबर जयंती सोमवारी</u>**

यंदाच्या वर्षीही हजरत महंमद पैगंबर यांची जयंती येत्या सोमवार 8 सप्टेंबरला जयंती साजरी करण्याबाबत निर्णय सिरत कमिटीच्या वतीने मुस्लिम समाजाच्या तर्फे घेण्यात आला आहे. यंदा १५०० वे जयंती वर्ष असल्यामुळे यावर्षी अधिक उत्साहाने धार्मिक प्रथा परंपरांचे पालन करून साजरी केली जाणार आहे.

**<u>प्रारुप प्रभाग</u>**

पुणे महापालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीसाठी तयार करण्यात आलेल्या प्रारुप प्रभाग रचनेवर ५ हजार ८४३ हरकती सूचना आल्या आहेत. कालच्या शेवटच्या दिवशी ३ हजार २४५ हरकती दाखल झाल्या आहेत. सर्वाधिक हरकती न-हे, वडगाव बुद्रक या प्रभागात असून ४१ प्रभागांमधील ३ प्रभागांमध्ये एकही हरकत आणि सुचना नोंदविण्यात आलेली नाही.

**<u>आत्महत्या प्रतिबंध</u>**

जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिनानिमित्त मानसिक आरोग्याबाबत जनजागृती करण्यासाठी शनिवार, १३ सप्टेंबरला  कँडल मार्चचे आयोजन करण्यात आलं आहे. आत्महत्या प्रतिबंधासाठी गेल्या वीस वर्षांपासून कार्यरत असलेल्या, कनेक्टिंग ट्रस्ट आणि रोटरी क्लब ऑफ पुणे- सारसबाग यांच्या पुढाकारातून हा कँडल मार्च सायंकाळी ६ वाजल्यापासून संभाजी उद्यान, जंगली महाराज रस्ता पुणे येथून निघणार आहे.

**<u>ऑपरेशन सिंदूर</u>**

देशाच्या शूरवीर जवानांना अभिवादन करण्यासाठी पुणे महापालिकेच्या "ऑपरेशन सिंदूर" या विशेष उपक्रमाची आज सुरुवात करण्यात आली. त्यात पुणे शहरातील विविध ठिकाणी नागरिकांसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सैनिकांना समर्पित मनोगत संदेश दाखविण्यात येणार असून माहितीपट आणि प्रेरणादायी संदेश सादर करत सैनिकांप्रती कृतज्ञतेचा दीप उजळविणार आहेत.

**<u>हवामान</u>**

पुणे शहर आणि परिसरात आज दिवसभर ढगाळ वातावरण होतं, कमाल तपमामान २८ तर किमान २२ अंश सेल्सिअस नोंदविण्यात आलं.

**तर हा होता आजचा पुणे वृत्तांत उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**